# **इंडिया फाऊंडेशन फॉर द आर्टस्**

त्यांच्या

आर्टस् प्रॅक्टिस कार्यक्रमांतर्गत

***Explorations***
प्रकल्पासाठी प्रस्ताव मागवत आहे

**अर्ज पाठवायची अंतिम तारीख: April 19, 2024**

आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रम अशा प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करतो जिथे कलाकार त्यांची कला नवीन पद्धतींनी वाढवायचा प्रयत्न करतात. यात रूढ संकल्पनांना आव्हान देणे असू शकते, कलानिर्मितीच्या सीमा रुंदावणे असू शकते, सादरीकरणातील नावीन्य असू शकते, स्थळ आणि प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्याचा नवीन मार्ग असू शकते, एकंदरीत प्रयोगशीलतेला प्राध्यान्य देणारे असे काहीतरी असू शकते.

*एक चित्रपट निर्माता जुन्या शहराच्या आठवणींवर दमदार पटकथा लिहितो*

*एक नृत्यदिग्दर्शक लोककथेत प्राण फुंकण्यासाठी 'लोकनृत्य' बसवतो*

*एक समकालीन कलाकार कुटुंबातील सदस्याने गोळा केलेल्या दैनंदिन वस्तूंचा खजिना ठेवण्यासाठी एक आभासी संग्रहालय तयार करतो*

*एक सामाजिक कलाकार, ग्रामीण महिलांच्या गटाला त्यांचे जीवनानुभव प्रतिबिंबित करण्यासाठी एक कलाकृती तयार करतो*

कलाकार म्हणून, कधीकधी, आपल्या मनात एखादी कल्पना चमकते किंवा एखाद्या रोमांचक वाटेवर जाण्याची आपल्याला इच्छा होते. पण, आपल्या कलेचे ठिकाण आणि संदर्भ लक्षात घेता या कल्पनांचा पाठपुरावा करणे काहीसे अनिश्चित आणि तात्पुरते वाटू शकते. ही अनवट वाट आपल्याला नक्की कुठे घेऊन जाईल याबद्दल कदाचित आपल्याला त्या वेळी काहीच माहिती नसू शकते. असं असलं तरी, असा पाठपुरावा करण्याची गरज आपल्याला तीव्रतेने जाणवते. अशा वेळी थोडासा आधार मिळाला तर नक्कीच उपयोगी पडू शकतो.

आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रमांतर्गत, आम्ही अशा शोधांसाठी प्रस्ताव मागवतो आहोत की जे नवीन, काहीश्या धोकादायक किंवा अगदी नवख्या कल्पनांचा मागोवा घेण्याचा, चाचणी घेण्याचा आणि पडताळून बघण्याचा प्रयत्न करतात. **यातून काही एक निष्पत्ती होणे हे अजिबात अपेक्षित नाही आहे**. अशा शोधांमध्ये संशोधन, पटकथा लेखन, लोकेशन शोध, ॲनिमॅटिक्स, जॅमिंग, स्टोरीबोर्डिंग, रिहर्सिंग, सॅम्पलिंग, रोबोटिक्स, लॅब एक्सप्लोरेशन आणि इतर प्रकारच्या शोधकार्याचा समावेश असू शकतो ज्याचा उपयोग या कल्पना पडताळण्यासाठी केला जातो.

ही प्रस्ताव मागणी इतर भारतीय भाषांमध्ये वाचण्यासाठी, येथे क्लिक करा.

**प्रकल्पाचा कालावधी:** कमाल सहा महिने

**एकूण खर्च (बजेट):** जास्तीतजास्त रुपये 1,00,000/-

**अंतिम तारीख:** **एप्रिल 19, 2024**

**अर्ज कोण पाठवू शकतात?**

आम्ही विविध कलाप्रांतात काम करणाऱ्या कला उपासकांकडून प्रस्ताव आमंत्रित करतो आहोत. ज्यांत पुढील कलाप्रांतांचा समावेश असू शकतो:

- संगीत, ध्वनी, लेखन, नृत्य, चळवळ, थिएटर, बोलक्या भावल्या, कथाकथन, जादू, सर्कस आणि इतर परफॉर्मन्स कलांमध्ये काम करणारे कलाकार
- चित्रपट (माहितीपट आणि कथेवर आधारित), अॅनिमेशन, छायाचित्रकार, प्रदर्शननिर्माते, नवमाध्यम हाताळणारे, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial intelligence), यांत्रिकनिर्मिती (robotics), संवादात्मक कलाप्रकार, खेळ, चित्रकला, शिल्पकला, printmaking, कॉमिक्स आणि इतर दृश्यकला प्रकारातील कलाकार.
- संग्राहक (Curators), विशेषकरून जे संग्रहालयाच्याऐवजी इतरत्र बाहेर कार्यरत आहेत ते.
- साहित्याशी निगडीत कवि, कादंबरीकार, नाटककार
- निरनिराळ्या कलाप्रांतात एकत्रितपणे काम करणारे कलाकार

**पात्रता:**

प्रस्ताव पाठवायची पात्रता भारतीय नागरिकत्व ही आहे. तुमचे प्रस्तावित सहकारीसुद्धा भारतीय नागरिक असणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी, इथे क्लिक करा.

**प्रस्ताव पाठवायची पद्धत:**

**तुम्ही तुमचा प्रस्ताव कोणत्याही भारतीय भाषेत किंवा इंग्लिशमधे लिहू शकता. आयएफए इंग्लिशव्यतिरिक्त भारतीय भाषांमधे लिहिल्या जाणाऱ्या प्रकल्पांना कायम प्रोत्साहित करते.**

प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असावा:

- तुमचे सध्याचे कलाक्षेत्र, त्यांत कलाकार म्हणून तुम्हाला असणारे प्रश्न आणि तुम्हाला असणारे स्वारस्य.
- तुम्हाला अपेक्षित असणाऱ्या शोधाचे तपशील आणि त्यांची कारणे.
- तपशीलवार वेळापत्रक आणि खर्चाचे तपशील.
- तुम्ही आधी केलेल्या कामाचे तपशील.
- पत्ता, फोन नंबर आणि इमेल आयडी यासह तुमचा बायोडाटा

- तुम्ही तुमचे प्रश्न आणि कच्च्या संकल्पना, आयएफएच्या कर्मचाऱ्यांच्या प्रतिक्रियेसाठी, लेखी स्वरूपात, ध्वनी स्वरूपात किंवा चित्रीकरण करून **April 12, 2024** पर्यंत पाठवू शकता.
- तुम्ही तुमचा अंतिम अर्ज, 25 एमबी पर्यंतच्या, एकाच इमेलद्वारे, जॉन झेविअर्स, प्रोग्रॅम ऑफिसर, आर्टस् प्रॅक्टिस यांना john@indiaifa.org इथे **April 19, 2024** अथवा त्यापूर्वी पाठवू शकता. या इमेलची सब्जेक्ट लाईन असेल: Project Proposal for Explorations (Arts Practice)

शंका किंवा स्पष्टीकरणासाठी, जॉन झेवियर्स यांच्याशी john@indiaifa.org इथे संवाद साधू शकता.

## निवड प्रक्रिया:

निवडक प्रस्ताव एका बाह्य समितीद्वारे तपासली जातील आणि अर्जदारांना या समितीसमोर त्यांच्या प्रकल्पाच्या संकल्पना सादर कराव्या लागतील. निवड झालेल्या प्रकल्पांची यादी **July 2024** मधे जाहीर करण्यात येईल.

**निवड झालेले सगळे प्रकल्प आयएफएद्वारे चालविले जातील.**

***कृपया लक्षात घ्या आयएफए एक असे सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे जे मुलांसह प्रत्येकाला समर्थन देते, त्यांचा आदर करते आणि त्यांना संरक्षण देते. प्रत्येक अर्जदाराने हे ध्यानात ठेवले पाहिजे आणि या संकल्पनेशी कायम इमान राखले पाहिजे.***